Volume - 3 (2023)
Issue - 1 (February)

LIBRARY SCHOLAR
International Peer-Reviewed Journal of Library Science

ISSN 2583-2549

# महाविद्यालय ग्रंथालय वाचकांसाठी नवउपक्रम आणि सेवा व सुविधा

**तुषार एस. गेडाम**
संशोधक
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र
(रा.तु.म.ना.वि.नागपूर)

**विकास एस बोरकर**
मार्गदर्शक
के.झेड.एस. विज्ञान महाविद्यालय
बाम्हणी, कळमेश्वर

.................................................................................................................................................

**सार** : महाविद्यालयीन ग्रंथालय नव वाचकांसाठी विविध उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करतात तसेच ग्रंथालयीन सेवा व सुविधांचा वाचकांना कशा प्रकारे महाविद्यालयीन कालावधीत आवश्यक पडणारे वाचन साहित्य, सेवा व सुविधा त्यांच्या गरजानुसार उपलब्ध करून गरज पुर्ण करण्याचे कार्य पार पाडते.

**कळशब्द** : महाविद्यालय ग्रंथालय, वाचक, ग्रंथालय सेवा व सुविधा

.................................................................................................................................................

## प्रस्तावना:

ग्रंथालयाचा मुळ उद्देश ज्ञान व माहिती संग्रहण हा असतो. समाजातील अनेक सामाजिक संस्था सारखी ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. इतर संस्थेप्रमाणे ती कार्य करित असते. ग्रंथालयीन वाचन साहित्याचे प्रभावी मांडणी करून वाचकांना ग्रंथालयात ग्रंथाविषयी आवड निर्माण व्हावी तसेच वाचकांना वाचन साहित्याचा पुरेपुर उपयोग कसा करता येईल यासाठी ग्रंथालयात विविध उपक्रम राबवून ग्रंथालयीन वाचन साहित्याचे उपयोग होईल व वाचक ग्रंथालयाकडे ओढला जाईल यासाठी ग्रंथालयात विविध सेवा व सुविधा देण्यांत येतात. त्यानुसार ग्रंथालयातील वाचन साहित्यांचा वांपर वाचक करीत असतात.

## ग्रंथालयीन वाचक व नवउपक्रम :

**वाचक:** यालाच ग्रंथालयीन भाषेत उपयोजक असेही म्हणतात. ज्याच्याशिवाय माहिती प्रणाली पुर्ण होऊशकतच नाही.

## Heidi Julien यांनी वाचकाचे केलेले वर्गीकरण :

**उपयोजक** (User): ही संज्ञा आहे, जी सर्वसाधारणपणे माहितीसेवेच्या आणि ग्रंथालयाच्या संदर्भात वापरली जाते.आणि संशोधन अभ्यासासंदर्भात सहभागी आणि प्रतिसादकांसाठी वापरली जाते.

**गिऱ्हाईक** (Client) :ही संज्ञा विशिष्ट प्रकारचा व्यावसायिक नातेसंबंध सुचविते.

**कायमचा ग्राहक** (Customer) :

ही संज्ञा सेवासुविधेसंबंधी व्यावसायिक प्रतिकृतीशी संबंधित आहे. कोणत्याही ग्रंथालयाची तत्परता आणि परिणामकारकता ही फक्त त्यांच्या ग्रंथसंग्रहावरून मोजता येत नाही तर ते ग्रंथालय त्याच्या वाचकांच्या कोणत्या सेवा व सुविधा उपलब्ध करून देते यांवर अवलंबून असते. त्यामुळे महाविद्यालयीन पायऱ्या चढणाऱ्या नवागंतुकांना महाविद्यालयीन ग्रंथालयाचा विद्यार्थी जिवनात आधार घ्यावा लागतो. त्यामुळे ग्रंथालयातील ग्रंथपालाला अशा नवीन वाचकांना ग्रंथालयाचा पुरेपुर उपयोग कशा करता येईल हया उद्देश्याने नवउपक्रम साधुन ग्रंथालयीन वाचन साहित्याचा पुरेपुर उपयोग होईल असे

उपक्रम राबवित असतो. त्यानुसार नवीन आगंतुकांसाठी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातुन वाचन साहित्याची आवड निर्माण करण्याचे ग्रंथालयीन नियम व सेवा, सुविधा यासाठी विशेष कार्यक्रम ठेवले जातात.

**ग्रंथालयीन वाचकांचे प्रकार:**

ग्रंथालयातील वाचक हे वेगवेगळया प्रकारचे असतात. जसे सार्वजनिक ग्रंथालयात येणारे वाचक प्रामुख्याने मुले, विद्यार्थी, गृहिणी, शेतकरी, सेवानिवृत्त व्यक्ती, साक्षर आणि संशोधक देखील असतात.शैक्षणिक ग्रंथालयात वाचक विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधक असतात.शैक्षणिकआणि विशेष ग्रंथालयामध्ये वाचक जवळ–जवळ एकसारखे असतात. म्हणून ग्रंथालयातील वाचकांप्रमाणे त्यांना वाचन साहित्य पुरविण्याचे कार्य ग्रंथालयाचे असते.

- **नव वाचकांसाठी महाविद्यालयाचे उपक्रम :**
  १. ग्रंथालय परिचय
  २. ग्रंथ ओळख
  ३. ग्रंथालयातील वाचकांना माहिती देणे
  ४. ग्रंथासंबंधी सामान्य सुचना

- **ग्रंथालय परिचय :**

यामध्ये वाचकांना ग्रंथालयातील विविध कामांचा परिचय करून दिला जातो. कामाचे तास, दिवस, विविध विभाग, ग्रंथालयीन संग्रह, ग्रंथालयीन नियम, नियतकालीके, सामान्य ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, ग्रंथालयीन शुल्क, सदश्य नोंदणी तसेच ग्रंथाची देवाण–घेवाण आणि ग्रंथालयीन कर्मचारी यांचा परिचय करून दिला जातो.

- **ग्रंथ ओळख:**

या भागात ग्रंथालयांत उपलब्ध साधन, सामुग्री यांवर माहिती दिली जाते. त्यामुळे वाचकांना ग्रंथालयाचा वापर करतांना साधे ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, ओपेक यांचा वापर, इंटरनेट सुविधांचा उपयोग कशा प्रकारे करावा याविषयी मार्गदर्शन ग्रंथपाल वाचकांना देत असतो.

- **ग्रंथालयातील वाचकांना माहिती देणे:**

ग्रंथालयात वाचक जेव्हा ग्रंथालयीन शुल्क भरतात त्यांना विविध सेवा व सुविधा देणे हे ग्रंथालयाचे कार्य असते. त्यानुसार विविध वाचक जसे महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थीनी, संशोधकांना दिशा निर्देश देवून ग्रंथालयीन साधनांचा पुरेपुर वापर व्हावा यासाठी प्रयत्न करते.

- **ग्रंथासबंधी सामान्य सुचना:**

वाचकांना ग्रंथालयीन नियमावलीचे पालन करण्याविषयी मार्गदर्शन केले जाते. यानुसार ग्रंथालयीन वाचकांना ग्रंथालयाची ओळख केली जाते. त्यानुसार ग्रंथालये वाचकांना सेवा व सुविधा बहाल करतात.

महाविद्यालयीन ग्रंथालये आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने आज विविध वाचन साहित्याच्या माध्यमानी आपल्या वाचकांना सेवा व सुविधा वाचकांना देता यावी म्हणून प्रयत्नरत असतात. त्यांनुसार ग्रंथालये खालील प्रमाणे वाचकांना सेवा व सुविधा पुरवीत असतात.

**त्यानुसार ...............................**

१. **ग्रंथ सेवा :** महाविद्यालयीन वाचकांना त्यांच्या विषयाशी संबंधीत (शाखा निहाय, कला, वाणिज्य व विज्ञान) ग्रंथ ग्रंथालयातुन देवाण–घेवाण करता येते.

२. **संदर्भ सेवा:** संदर्भ सेवेद्वारे ग्रंथालयीन वाचकाला हवी हसलेली माहिती पुरवीली जाते.

३. **प्रतिलिपी सेवा:** ग्रंथालयामध्ये बरीच पुस्तके महाग असल्यामुळे ग्रंथ जास्तीचे खरेदी करणे ग्रंथालयाला परवडणारे नसते. कारण ग्रंथालयाच्या अनुदानात सतत पाहिजे तेवढी वाढ होत नाही. अशावेळी वाचकांना संदर्भ ग्रंथपालाने ग्रंथालयामध्ये बसुन न वाचता वाचकाने ती गहाळ केली तर दुसरा ग्रंथ मिळणे शक्य नसते अशावेळी या दुर्मिळ ग्रंथांना दुसऱ्या वाचनालयात दयायचे असले किंवा त्यातील महत्वाचा मजकूर अभ्यासकाला पाहिजे असेल तर त्यासाठी ग्रंथालयामध्ये झेरॉक्स मशीनद्वारे ती माहिती व हवी असल्यास ग्रंथाची दुसरी प्रत काढण्यात येते.

४. **प्रचलित जागरूकता सेवा:**देशात कोणत्याही ठिकाणी नवीन–नवीन घटना घटत असतात. त्या घटनाची अद्यावत माहिती करून घेणे आवश्यक असते. म्हणून अशी माहिती ग्रंथालयात उपलब्ध करून दिली जाते.

५. **आंतर ग्रंथालय देवाण–घेवाण सेवा:** आपल्या ग्रंथालयात उपलब्ध नसलेले वाचन साहित्य इतर महाविद्यालयीन ग्रंथालयातुन उपलब्ध करून देता येते.

६. **ग्रंथ आरक्षण सेवा:** ग्रंथालयांत उपलब्ध असलेली ग्रंथाची कमतरता यानुसार ग्रंथवाचकांसाठी आरक्षित करून ठेवता येते.

७. **वृत्तपत्र कात्रण सेवा:** ग्रंथालयामध्ये आवश्यक अशी वार्ता जेव्हा वर्तमान पत्रांत किंवा नियतकालिकांत येत असतात त्या वृत्तांची गरज लक्षांत घेता त्यांना विद्यार्थी, शिक्षक किंवा संशोधकांच्या आवश्यकतेनुसार ग्रंथालयांत आल्यानंतर काही कालावधीत त्याला कात्रण करून इतरांची त्या वृत्तांची गरज भागविता येते त्यालाच कात्रण सेवा म्हणतात.

८. **इंटरनेट सेवा:** महाविद्यालयीन वाचकांना नव–नवीन ज्ञान साहित्याची आवश्यकता पडत असते त्यानुसार ग्रंथालयांत वाचकांना इंटरनेट सेवा प्रदान करण्यांत येते.

९. **ई–जनरल्स सेवा:**माहितीच्या जाळयांचे स्वयंत्र इतके जलद आहे. प्रत्येक माहिती प्राप्त करण्याचे साधन आज उपलब्ध विविध मार्गानक प्राप्त होत आहे. त्यानुसार मालकी हक्क व बौध्दीक संपत्ती यांवर नियंत्रण ठेवता येते. विविध म्श्रवनतदंस इंटरनेट द्वारे ग्रंथालयांत उपलब्ध केली जातात.

१०. **ई–मेल e-mail/E-Book सेवा:**सध्याच्या आधुनिक युगात इलेक्ट्रनिक्स पुस्तक वाचन करण्याची ओढ लागली आहे. अशा प्रकारचे साहित्य आज ग्रंथालय उपलब्ध करून देते.

११. **ग्रंथ निर्देश सेवा:** ग्रंथालयातील वाचन साहित्य नेमके कोठे ठेवले आहेत त्यासाठी विविध विभागातील कर्मचारी वर्ग ग्रंथ निर्देशित करतात.

१२. **वृत्तपत्र सेवा:**दररोज घडत असलेल्या जगातील घडामोडीच्या बातम्या वृत्तपत्रांत प्रकाशित होत असतात. त्यानुसार ही सेवा ग्रंथालये वाचकांना देतात. तसेच इतर बऱ्याच सेवा ग्रंथालये आज आधुनिकतेची जोड धरून सेवा वाचकांना प्रदान करतात.

**: ग्रंथालयातील विविध सेवा :**

ग्रंथालयाचे प्रशासन योग्य प्रकारे चालविता येण्यासाठी विविध सुविधा वाचकांसाठी देण्यांत येतात. त्यानुसार महाविद्यालयातील वाचक समाधानी होतील त्यानुसार सुविधा वाचकांसाठी ग्रंथालय देत असते.

- संगणक विद्यार्थीसाठी
- प्रिंटर
- स्कॅनर
- इंटरनेट
- झेरॉक्स
- ओवर हेड प्रोजेक्टर
- ग्रंथपेढी योजना
- रोजगार विषयक मार्गदर्शन
- ग्रंथालयात व्याख्यान, कार्यशाळा, चर्चासत्र
- वाचक मंडळ
- सुची मार्गदर्शन
- ग्रंथ प्रदर्शन
- स्पर्धा परिक्षांची तयारी
- वाचकांमध्ये वाचन वृत्ती वाढविण्यांत मदत करणे.
- आंतर ग्रंथालय लोन सुविधा
- वेगळे वाचन कक्ष
- वाचकांसाठी मुक्त द्वार पध्दत
- उत्कृष्ठ वाचक पारितोषिक

अशा प्रकारे महाविद्यालयीन ग्रंथालयाद्वारे वाचकांना विविध सेवा व सुविधा ग्रंथालयात देत असतात.

**सारांश:**

महाविद्यालयीन ग्रंथालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधांचा वापर करून वाचकांना योग्य प्रकारे शिक्षण घेवून आपले पुढचे आयुष्य जगण्यासाठी आधार स्तंभ तयार करते.

**संदर्भ सुची:**

१. लेले, वसंत वि, ग्रंथालय आणि उपयोजक. पूणे: युनिवर्सल प्रकाशन, २०१३
२. जैन, प्रकाश व इतर, सुलभ ग्रंथालयशास्त्र, नागपूर: विश्व पब्लिशर्स, २००९
३. निकोसे, सत्यप्रकाश, ग्रंथालय व माहितीशास्त्र संशोधक पध्दती, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन, २००७
४. Dhankhar, Anita : User Education, Academic Libraries, edujourn international Journal of Education. Vol. 5(2), 2016.